**मराठा विद्या प्रसारक समाज,नाशिक**

**कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,ओझर(मिग)**

**समुपदेशन आणि मूल्य शिक्षण समिती**

**(२०२२-२३)**

**अहवाल**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी समुपदेशन आणि मूल्य शिक्षण समिती स्थापन करण्यात आली.त्यात खालील सदस्य होते.

| अनु.क्र. | समिती सदस्य | पद | शाखा |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्य .डॉ.पी.आर.भदाणे | अध्यक्ष | विज्ञान |
| १ | डॉ.उषा सोरते | सदस्य | कला |
| २ | डॉ.संध्या सरदार | सदस्य | विज्ञान |
| ३ | प्रा.श्वेताली सोनवणे | सदस्य | वाणिज्य |

सदर समितीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये केलेल्या कामकाजाचा अहवाल देत आहे.

आमचे महाविद्यालय ग्रामीण भागातील असून विद्यार्थिनींना फार गंभीर समस्यांना फारसे तोंड द्यावे लागत नाही, असे असले तरी या समितीने विद्यार्थिनींना विविध विषयाच्या अनुषंगाने समुपदेशन करून त्याच्यात काही मूल्य रुजविण्याचा प्रयत्न केला.त्याचबरोबर मुलींना असणाऱ्या समस्या महाविद्यालयीन पातळीवर सोडवण्याचा प्रयत्न केला. मुलींनी त्याला चांगला प्रतिसाद दिला.

साधारणपणे आम्ही तरुणवयातील मुलींना या वयात असणारे धोके समजावून सांगितले.त्यासाठी मुलींनी कोणती काळजी घेणे आवश्यक आहे? स्वत: स्वत:चे कसे संरक्षण करता येईल?त्याचबरोबर सेक्स्युअल हॅरॅसमेंट यासारख्या विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

दिनांक २९ डिसेंबर २०२२ रोजी प्रा.श्वेताली सोनवणे यांनी महाविद्यालयातील काही मुलींना वैयक्तिक पातळीवर मार्गदर्शन केले. त्यात वयात येणाऱ्या मुलींच्या समस्या, त्यावेळी घ्यावयाची काळजी, मुलींमध्ये असणारी रक्ताची कमतरता, त्यांच्या आरोग्याच्या समस्या भविष्यकाळात येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी करावयाची पूर्वतयारी, मातृत्व यासारख्या विषयावर मार्गदर्शन केले.

Scanned by CamScanner

दिनांक १२ जानेवारी २०२२-२३ रोजी डॉ. उषा सोरते यांनी महाविद्यालयात मुलींसाठी सदाचाराचे वळण लावण्याच्या उद्देशाने मूल्याशिक्षणाला आलेले महत्व विशद केले. त्यावेळी त्यांनी आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल, संगणक यांच्या आहारी आजची तरूण पिढी जात आहे. त्यामुळे समाजाची नैतिकता ढासळत चालली आहे. त्यासाठी मुलांसाठी नैतिक शिक्षणाची खऱ्या अर्थाने गरज आहे, असे प्रतिपादन केले. तर प्रा.प्राजक्ता देशमुख यांनी आज अल्पवयीन मुले चोरी, वाईट व्यसने, बलात्कार यासारख्या गुन्ह्यांमध्ये सहभागी झालेले किंवा त्या अत्याचाराला बळी पडलेले दिसतात.त्यामुळे समाजामध्ये अनैतिकता वाढलेली दिसत आहे. मूल्य शिक्षणाने मुलींना आपल्या नैतिकतेचे भान येईल असे सांगत मैत्रीत पारदर्शकता ठेवून आपल्याला येणाऱ्या समस्या किमान आपल्या मैत्रिणीला तरी सांगितल्या पाहिजे. असे प्रतिपादन करत अश्या समस्या महिला प्राध्यापकांकडे आल्या तर आम्ही त्या महाविद्यालयीन पातळीवर सोडवण्याचा प्रयत्न करू असा विश्वास त्यांनी मुलींना दिला.

सदर समितीने याशिवाय वैयक्तिक पातळीवर मुलींच्या विविध प्रश्नांवर समुपदेशन करून त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. नैतिक, मानसिक,भावनिक पातळीवर येणाऱ्या समस्या, त्यातून त्यांच्या मनात निर्माण झालेली असुरक्षितता महाविद्यालयीन पातळीवर दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कुठेच सांगता न येणारे अनेक गोष्टी विद्यार्थिनीन संकोचता या समितीकडे सांगू शकता ,हा विश्वास या समितीने विद्यार्थिनींच्या मनात निर्माण केलेला आहे. आणि हेच या समितीचे यश आहे.

महाविद्यालयातीलप्राचार्य, उपप्राचार्य,प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या समितीच्या यशासाठी विशेष परिश्रम घेतले.

( डॉ.उषा सोरते )
समन्वयक

( डॉ.पी.आर.भदाणे )
प्रभारी प्राचार्य

Scanned by CamScanner

## समुपदेशन आणि मूल्य शिक्षण समिती
## (२०२२-२३)



प्रा.श्वेताली सोनवणे विद्यार्थिनीशी तरुण मुलींच्या आरोग्याच्या समस्या व घ्यावयाची काळजी यासंदर्भात मार्गदर्शन करतांना.



प्रा.प्राजक्ता देशमुख नैतिक शिक्षणाच्या संदर्भात मार्गदर्शन करतांना.

प्राचार्य
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
ओझर(मि ... जि.नाशिक

Scanned by CamScanner



डॉ.उषा सोरते विद्यार्थिनींशी मूल्य शिक्षणासंदर्भात संवाद साधतांना.

प्राचार्य
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
ओझर(मिग),ता.निफाड,जि.नाशिक

Scanned by CamScanner